प्रेसनोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोस गजानन नारायण मान्टे वय ४३ वर्ष पद तलाठी, वर्ग—३, तलाठी ग्राम खेर्डी /किन्ही महादेव, ता.खामगांव जि. बुलडाणा रा. सावखेड तेजन ता. सिंदखेडराजा जि. बुलडाणा ह.मु. तायडे कॉलनी खामगांव |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/— रुपये |
| घटनास्थळ | जळका तेली गावाला लागुन असलेले पुल |
| घटना तारीख | १३.०७.२०२१ |

थोडक्यात हकीकत :—

यातील तक्रारदार यांनी त्यांचे वडीलांचे मृत्युपत्रानुसार दिलेल्या शेतीची नोंद सातबा—यावर घेउन फेरफार नक्कल दिल्याचा मोबदला व उर्वरित विहीरीची नोंद सातबा—यावर घेण्यासाठी लोकसेवक गजानन नारायण मान्टे तलाठी ग्राम खेर्डी /किन्ही महादेव, ता.खामगांव जि. बुलडाणा हे ५००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक १२.०७.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक गजानन नारायण मान्टे तलाठी ग्राम खेर्डी /किन्ही महादेव, ता.खामगांव जि. बुलडाणा यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना वडीलांचे मृत्युपत्रानुसार दिलेल्या शेतीची नोंदसातबा—यावर घेउन फेरफार नक्कल दिल्याचा मोबदला व उर्वरित विहीरीची नोंद सातबा—यावर घेण्यासाठी ५००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने दि. १३.०७.२०२१ रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्यात आली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन ५००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारली.

लोकसेवक यांना ताब्यात घेवुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेवक लोकसेवक गजानन नारायण मान्टे तलाठी ग्राम खेर्डी /किन्ही महादेव, ता.खामगांव जि. बुलडाणा यांनी आपल्या लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैशाचे स्वरुपातील आर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचेविरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :—१. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा.श्री. संजय चौधरी पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शनब्युरो बुलडाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, नापोकॉ मो.रिजवान, पोकॉ विनोद लोखंडे, अझरोद्दीन काझी यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे

(सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner